# शुध्दिपत्रक

केंद्र शासनाकडुन प्राप्त होणा-या अनुदानातून महाराष्ट्र ट्रायबल पब्लीक स्कूल सोसायटी,नाशिक मार्फत महाराष्ट्र राज्यात चालविण्यात येणा-या ४ एकलव्य रेसिडेंशियल पब्लीक स्कूलमध्ये रिक्त असलेली पदे भरणेसाठी दिनांक ५/६/२०१० च्या दैनिक लोकमत, दिनांक ७/६/२०१० च्या दैनिक सकाळ व दैनिक पुण्यनगरी व दिनांक ८/६/२०१० च्या मिड डे (इंग्रजी) या वर्तमान पत्रातुन तसेच आदिवासी विकास विभागाच्या WWW.Mahatribal.gov.in या वेबसाईटवर जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती.

त्यामध्ये अनुक्रमांक ८ वरील परीक्षेच्या दिर्घोत्तरी /वर्णनात्मक या स्वरुपामध्ये बदल करुन त्याऐवजी पदव्युत्तर पदवीधर प्रशिक्षित शिक्षक (पी.जी.टी.) , प्रशिक्षित पदवीधर शिक्षक (टी.जी.टी.) या पदांसाठी कला/विज्ञान शाखेतील विषयाचे ज्ञान , इंग्रजी, सामान्यज्ञान व बौध्दिक चाचणी यासाठी प्रत्येकी ५० गुण ठेवून २०० गुणाची " वस्तुनिष्ठ बहुपर्यायी " परीक्षा घेणे असा बदल करण्यात आला आहे. सदर परीक्षा भारतातील मान्यता प्राप्त विद्यापिठाच्या पदवी परीक्षेच्या दर्जाच्या समान राहील. तरी सदर पदासाठी अर्ज केलेल्या उमेदवारांनी याबदलाची नोंद घ्यावी .

तसेच जाहिरातीत नमूद केलेल्या गृहप्रमुख, स्टाफनर्स व प्रयोगशाळा सहाय्यक या पद भरतीस शासनाची स्थगिती आहे. त्यामुळे सदर पदांची लेखी परीक्षा तुर्तास घेतली जाणार नाही. असे सदस्य सचिव महाराष्ट्र ट्रायबल पब्लीक स्कूल सोसायटी नाशिक यांनी कळविले आहे.

सदस्य सचिव
महाराष्ट्र ट्रायबल पब्लिक स्कूल सोसायटी नाशिक तथा
आयुक्त, आदिवासी विकास महाराष्ट्र राज्य, नाशिक